पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १०

**सभावृत्तांत**

दिनांक - **०२/०२/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०२/०२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंमद
३. मा.वसंत (नाना) लोंढे
२. मा.जाधव साधना रामदास
३. मा.पाटील सुजित वसंत
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) प्रभाग क्र.२१ उद्योगनगर झोपडपट्टीमध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.सुजित पाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.२१ संतोषनगर झोपडपट्टीमध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.२१ विजयनगर झोपडपट्टीमध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रभाग क्र.२१ उद्योगनगर झोपडपट्टीत पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) शहर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प अंतर्गत अजंठानगर येथील प्रकल्पामध्ये स्थापत्य विषय कामे करणेबाबत - मा.अमिना पानसरे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) शहर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प अंतर्गत विठ्ठलनगर येथील प्रकल्पामध्ये स्थापत्य विषय कामे करणेबाबत - मा.अमिना पानसरे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव.

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक - मा.अमिना पानसरे                                   अनुमोदक - मा.वसंत लोंढे

मंगळवार दिनांक ०२/०२/२०१६ दुपारी ३.०० वा. मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक ०४/०२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

**सभापती -** गुरुवार दिनांक ०४/०२/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १०

**सभावृत्तांत**

**(** दिनांक ०२/०२/२०१६ ची तहकूब सभा **)**

दिनांक - **०४/०२/२०१६** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची दिनांक ०२/०२/२०१६ ची तहकूब सभा गुरुवार दिनांक **०४/०२/२०१६** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सौ.स्वाती प्रमोद साने - सभापती**
२. मा.सौ.पानसरे अमिना महंमद
३. मा.वसंत (नाना) लोंढे
२. मा.जाधव साधना रामदास
३. मा.पाटील सुजित वसंत
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा.बारणे निलेश हिरामण

या शिवाय मा.दंडवते - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंपी - नगररचनाकार, मा.पुजारी - कार्यकारी अभियंता, मा.ऐवले - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक १९/०१/२०१६ रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक ९)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक – ०१
दिनांक – ०४/०२/२०१६ विभाग - नगररचना व विकास
सुचक – मा.साधना जाधव अनुमोदक – मा.सुजित पाटील
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिं.गुरव/टे-८/६८८६/२०१५, दि.०१/१०/२०१५

विषय - मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.७९ पैकी व ८० पैकी जागेत आरक्षण क्र.३५६, “ प्राथमिक शाळा विस्तार ” चे जमिनीचे भूसंपादन करणेबाबत ...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४ विषय क्रमांक – २ व ३
दिनांक – ०४/०२/२०१६ विभाग - अ प्रभाग
सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.अमिना पानसरे
संदर्भ – १) विषय क्र.२ अन्वये मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव -
२) प्रशासन अधिकारी तथा सचिव अ क्षेत्रीय कार्यालय यांचे जा.क्र.अक्षेका/११/कावि/२०/ २०१६, दि.१६/०१/२०१६
३) विषय क्र.३ अन्वये अ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ५० दिनांक १३/०१/२०१६

मा.आरती चोंधे, मा.अमिना पानसरे यांचे प्रस्तावानुसार व अ प्रभाग समिती सभा ठराव क्रमांक ५० दिनांक १३/०१/२०१६ नुसार पिंपरी चिंचवड महानगरनपालिका हद्दीतील मौजे आकुर्डी मंजूर विकास योजना आराखडयात स.नं.१७९ पैकी मध्ये आरक्षण क्र.२७३ हे प्राथमिक शाळा आरक्षण असून आरक्षणातील क्षेत्रामध्ये सुमारे ४०० कुटुंबे राहतात. या आरक्षणामधील जागेत आरक्षण मंजूर होण्याअगोदर पासून घरे आहेत. तसेच या आरक्षणाचे आजूबाजूला म्हणजेच अर्धा ते एक किलोमीटरचे अंतरावर १३ ते १४ शाळा आहेत व महानगरपालिकेची श्री.वसंतदादा पाटील माध्यमिक विद्यालय हे या प्रभागात आहे. त्यामुळे मंजूर विकास योजनेतील स.नं.१७९ पैकी मधील अरक्षण क्र.२७३ ची आवश्यकता नाही. म्हणून मंजूर विकास योजनेतील स.नं.१७९ पैकी मधील आरक्षण क्रमांक २७३ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये रद्द करुन सदर आरक्षणातील क्षेत्र रहिवासी विभागात समाविष्ट करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ४५ विषय क्रमांक – ४
दिनांक – ०४/०२/२०१६
सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.सुजित पाटील
संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.सुजित पाटील यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२१ उद्योगनगर झोपडपट्टी मध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणे निविदा क्र.१/१/२०१५-१६ कामाची निविदा र.रु.९,३३,३१५/- व अंदाजपत्रकीय रक्कम १० लक्ष इतकी आहे. सदरचे काम प्रभाग क्र.२१ उद्योगनगर झोपडपट्टीमध्ये चालू आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत झोपडपट्टीधारकांना व्यक्तीगत शौचालयाची योजना कार्यान्वीत आहे. त्यामुळे संपुर्ण दळवीनगर झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम होत आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे तेथे ब्लॉक ऐवजी सर्वत्र कॉंक्रीट पेव्हिंग करून सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे तथा इतर अनुषंगिक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दळवीनगर, उद्योगनगर मधील रस्त्यांच्या दुरुस्तीची व्याप्ती पाहता सदरच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याकामी सुमारे २० लक्ष रुपये इतक्या रक्कमेची वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रभाग क्र.२१ उद्योगनगर झोपडपट्टी मध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणेकामी निविदा क्र.१/१/२०१५-१६ या कामाची मुळ १०,००,०००/- व सुधारित प्रशासकीय अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २०,००,०००/- असे एकूण र.रु.३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस

लाख फक्त) इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत उपरोक्त कामाची तातडी विचारात घेता सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता त्याची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६ विषय क्रमांक – ५

दिनांक – ०४/०२/२०१६

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२१ संतोषनगर झोपडपट्टी मध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणे निविदा क्र.१/३७/२०१५-१६ कामाची निविदा र.रु.९,३३,३१५/- व अंदाजपत्रकीय रक्कम १० लक्ष इतकी आहे. सदरचे काम प्रभाग क्र.२१ संतोषनगर झोपडपट्टीमध्ये चालू आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत झोपडपट्टीधारकांना व्यक्तीगत शौचालयाची योजना कार्यान्वीत आहे. त्यामुळे संपुर्ण दळवीनगर प्रभागातील झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम होत आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे तेथे ब्लॉक ऐवजी सर्वत्र काँक्रीट पेव्हिंग करुन सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे तथा इतर अनुषंगिक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दळवीनगर प्रभागातील उद्योगनगर/संतोषनगर मधील रस्त्यांच्या दुरुस्तीची व्याप्ती पाहता सदरच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याकामी सुमारे २० लक्ष रुपये इतक्या रक्कमेची वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रभाग क्र.२१ संतोषनगर झोपडपट्टीतील स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणे निविदा क्र.१/३७/२०१५-१६ या कामाची मुळ १०,००,०००/- व सुधारित प्रशासकीय अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ५,००,०००/- असे एकूण र.रु.१५,००,०००/-(अक्षरी र.रु.पंधरा लाख फक्त) इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत उपरोक्त कामाची तातडी विचारात घेता सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता त्याची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४७ विषय क्रमांक – ६

दिनांक – ०४/०२/२०१६

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.अमिना पानसरे

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२१ विजयनगर झोपडपट्टी मध्ये स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणे निविदा क्र.१/२९/२०१५-१६ कामाची निविदा र.रु.९,३३,३१५/- व अंदाजपत्रकीय रक्कम १० लक्ष इतकी आहे. सदरचे काम प्रभाग क्र.२१ दळवीनगर प्रभागातील विजयनगर/उद्योगनगर झोपडपट्टीमध्ये चालू आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत झोपडपट्टीधारकांना व्यक्तीगत शौचालयाची योजना कार्यान्वीत आहे. त्यामुळे संपुर्ण दळवीनगर झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम होत आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे तेथे ब्लॉक ऐवजी सर्वत्र काँक्रीट पेव्हिंग करुन सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे तथा इतर अनुषंगिक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दळवीनगर प्रभागातील विजयनगर/उद्योगनगर मधील रस्त्यांच्या दुरुस्तीची व्याप्ती पाहता सदरच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे

काम करणे आवश्यक आहे. याकामी सुमारे २० लक्ष रुपये इतक्या रक्कमेची वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रभाग क्र.२१ मधील विजयनगर झोपडपट्टीतील स्थापत्य विषयक कामांची देखभाल दुरुस्ती करणेकामी निविदा क्र.१/२९/२०१५-१६ या कामाची मुळ व सुधारित प्रशासकीय अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत उपरोक्त कामाची तातडी विचारात घेता सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता त्याची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४८ विषय क्रमांक – ७

दिनांक – ०४/०२/२०१६

सुचक – मा.वसंत लोंढे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ – मा.वसंत लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२१ उद्योगनगर झोपडपट्टीत पेव्हींग ब्लॉक निविदा क्र.१/६२/२०१५-१६ निविदा र.रु.९,३३,३१५/- व अंदाजपत्रकीय रक्कम १० लक्ष इतकी आहे. सदरचे काम प्रभाग क्र.२१ उद्योगनगर झोपडपट्टीमध्ये चालू आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत झोपडपट्टीधारकांना व्यक्तीगत शौचालयाची योजना कार्यान्वीत आहे. त्यामुळे संपुर्ण दळवीनगर झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम होत आहे. झोपडपट्टीतील रस्ते खणल्यामुळे तेथे ब्लॉक ऐवजी सर्वत्र कॉंक्रीट पेव्हिंग करुन सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे व काही ठिकाणी ब्लॉक बसविणे तथा इतर अनुषंगिक दुरुस्ती करणे आवश्यक आहे. दळवीनगर, उद्योगनगर मधील रस्त्यांच्या दुरुस्तीची व्याप्ती पाहता सदरच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणे व त्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे. याकामी सुमारे २० लक्ष रुपये इतक्या रक्कमेची वाढ करणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रभाग क्र.२१ मधील उद्योगनगर झोपडपट्टीत पेव्हींग ब्लॉक बसविणे, निविदा क्र.१/६२/२०१५-१६ या कामाची मुळ व सुधारित प्रशासकीय अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ३०,००,०००/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत उपरोक्त कामाची तातडी विचारात घेता सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता त्याची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४९ विषय क्रमांक – ८

दिनांक – ०४/०२/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.अमिना पानसरे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

अजंठानगर पुनर्वसन प्रकल्पामध्ये निविदा नोटीस क्र.१४/२/२०१५-१६ अन्वये शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत अजंठानगर येथील प्रकल्पामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेचे काम BSUP प्रकल्पामार्फत सुरु असून त्याची निविदा र.रु.२३,३३,७९८/- आहे. सदर प्रकल्पातील A1 इमारतीच्या सभोवतालचा परिसर झोपडपट्टी क्षेत्र असल्याने इमारतीमधील तोडफोड करण्यात आलेल्या स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, ड्रेनेज व इतर कामांची दुरुस्ती करुन ११२ पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा लवकर द्यावयाचा आहे. उपरोक्त कामे पूर्ण करणेकरीता र.रु.४८,००,०००/- एवढा खर्च आवश्यक आहे. सदर निविदेचा दर १५% कमी आहे. तरी उपरोक्त

कामे पूर्ण करणेकामी सदर निविदेची सुधारित किंमत र.रु.४८,००,०००/- (अक्षरी र.रु.अठ्ठेचाळीस लाख फक्त) रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ५० विषय क्रमांक – ९

दिनांक – ०४/०२/२०१६

सुचक – मा.अमिना पानसरे अनुमोदक – मा.साधना जाधव

संदर्भ – मा.अमिना पानसरे, मा.साधना जाधव यांचा प्रस्ताव -

विठ्ठलनगर पुनर्वसन प्रकल्पामध्ये निविदा नोटीस क्र.१४/१/२०१५-१६ अन्वये शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत विठ्ठलनगर येथील प्रकल्पामध्ये स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणेचे काम BSUP प्रकल्पामार्फत सुरु असून त्याची निविदा र.रु.२३,३४,२०७/- आहे. सदर प्रकल्पातील A1 इमारतीच्या सभोवतालचा परिसर झोपडपट्टी क्षेत्र असल्याने इमारतीमधील तोडफोड करण्यात आलेल्या स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, ड्रेनेज व इतर कामांची दुरुस्ती करुन ११२ पात्र लाभार्थ्यांना सदनिकांचा ताबा लवकर द्यावयाचा आहे. उपरोक्त कामे पूर्ण करणेकरीता र.रु.४८,००,०००/- एवढा खर्च आवश्यक आहे. सदर निविदेचा दर १५% कमी आहे. तरी उपरोक्त कामे पूर्ण करणेकामी सदर निविदेची सुधारित किंमत र.रु.४८,००,०००/- (अक्षरी र.रु.अठ्ठेचाळीस लाख फक्त) रकमेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सौ.स्वाती प्रमोद साने )**
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७३ /२०१६
दिनांक : ०५ /०२/२०१६



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.Shahar Sudharna Samitee Proceeding 10 doc.